**MHST050007432019**

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.२०७/२०१९ मधील नि.४४ खालील आदेश.</u>**

(राजाराम पिसाळ विरुध्द शामराव पिसाळ)

---

वादींतर्फे विद्वान वकील श्री. खारकर. आर. एम.

प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. जाधव एन. वाय.

---

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ आणी आदेश ०१ नियम ०९ नुसार दावा दुरूस्ती करन दाव्यात नवीन पक्षकार सामील करणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाचे कामी वादींचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, ताकीद व जाहीर ठरावाकरीता दाखल केला असून, वादग्रस्त खरेदीखत हे वादींच्यावर बंधनकारक नाही अशी विनंती केली आहे. सदरचे खरेदीखत हे दाव्याचा भाग असून त्यासोबत काही कागदपत्रे दाखल केली आहेत.

**०३.** सदरच्या खरेदीखतावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.०२ कांताबाई व रामचंद्र खाशाबा पिसाळ यांचेमध्ये सदरचा करार झालेला आहे. दावा कलम ५ मध्ये नमुद मजकूर हा जाहीर ठरावाबद्दलचा असून, प्रतिवादी क्र.०२ यांनी केलेले सदरचे तथाकथीत खरेदीखत हे वादींच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळावा अशी विंनती वादी यांनी केलेली आहे. सदरचा दस्त झाले नंतर रामचंद्र खाशाबा पिसाळ यांनी 'महाराष्ट्र महसुल अधिनियम कलम, ८५' प्रमाणे

दिनांक ०६/०७/२०१४ रोजीच्या वाटणीपत्रा नुसार वाटप व्हावे म्हणुन अर्ज दिले नुसार दावा कलम '०१ अ आणी ०१ ब' या मिळकती प्रतिवादी क्र.०३ संजय यांना गेल्या. सबब वादींनी त्यांना प्रतिवादी क्र.०३ म्हणुन सामील केलेले आहे. मात्र सदरची मिळकत दिनांक २५/०९/२००८ रोजी विकत घेणारे 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' यांना नजरचुकीने या कामी पक्षकार म्हणुन सामील करणेचे राहुन गेले आहे. प्रस्तुत कामी सदरील संजय पिसाळ हे मयत झालेवर त्यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र.०३अ ते ०३क या कामी हजर झाले आहेत व त्यांनी 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' यांना पक्षकार केले नसल्यामुळे वादीचा दावा आदेश ०७ नियम ११ नुसार फेटाळणेत यावा या करिता अर्ज दिला आहे. प्रस्तुतचा दावा गुणावगुणावर निकाली होणेस तसेच दाव्यात कोणतीही तांत्रीक अडण राहु नये म्हणुन रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना या कामी प्रतिवादी क्र.०६ म्हणुन सामील करुन घेणे आवश्यक झाले आहे. सबब ह अर्ज.

**०४.** प्रतिवादी क्र.०३अ ते ०३क यांनी प्रस्तुत अर्जास नि.४७–अ वर म्हणणे दाखल करून तीव्र आक्षेप घेतला आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादींनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या अर्जातील परिच्छेद क्रमांक ०४ मध्ये कथन केले प्रमाणे या प्रतिवादींनी 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' हे आवश्यक पक्षकार असताना वादीने त्यांना पक्षकार केले नसल्यामुळे वादीचा दावा आदेश ०७ नियम ११ नुसार फेटाळणेत यावा' या करिता अर्ज दिले नंतर पश्चात बुध्दीने व वादीद्वारे झालेली चुक दुरूस्त करण्यासाठी दिला आहे. वादीने निशाणी ४० वरील आदेश ०७ नियम ११ चे म्हणने (नि.४८) दाखल करताना रामचंद्र खाशाबा पिसाळ हे या दावरूात आवश्यक पक्षकार आहेत याची

माहिती वादींना हा दावा दाखल करतानाच म्हणजेच सन २०१९ मध्येच माहिती होते असे कथन केलेले आहे. वादींनी दाव्यामध्ये दिनांक २५/०९/२००८ रोजीचे खरेदीखत त्यांच्यावर बंधनकारक नाही व त्याची माहिती वादींना एप्रिल १०१९ मध्ये मिळाली म्हणुन हा दावा दाखल केला आहे असे कथन केले आहे. याचाच अर्थ असा होतो की, रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना या कामी प्रतिवादी क्र.०६ म्हणुन दावा दाखल करतानाच सामील करणे आवश्यक व गरजेचे होते परंतु तसे झालेले नाही. आता वादीची जाहीर ठरावाची/उद्घोषणेची मागणी मुदतबाह्य झाली आहे. त्यास मुदतीच्या कायद्याची स्पष्ट बाधा आहे. वादीचा अर्ज मंजुर केलेस मुदतबाह्य मागणी मान्य केल्या सारखे होणारे असल्याने तसेच वादीची मागणीच मुळात बेकायदेशीर झाली असल्याने वादींचा हा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०५.** प्रतिवादींनी त्यांचे म्हणन्याच्या समर्थनाथ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

| अ.क्र. | तपशील. |
|---|---|
| ०१. | केंचेगोवडा तर्फे वारस वि. सिद्धेगोवडा ऊर्फ मोटेगोवडा.<br>ए.आय.आर ऑनलाईन १९९४ एस.सी. २९४. |
| ०२. | लाला गुरू प्रसाद वि. श्रीमती लक्ष्मी देवी.<br>ए.आय.आर १९६८ अलाहाबाद २०१ |
| ०३. | गेला राम वै. वि. कैलाश नाथ आणी इतर.<br>सिव्हील रिव्हीजन क्र.८२६/१९७५, निकाल दिनांक २२/१२/१९७५. |

०६. वादी–प्रतिवादींचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षातर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी वकीलांचा युक्तीवाद, अर्जातील कथने आणि इतर कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तुत अर्जाचा निर्णय करणेहेतू माझ्यासमोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न. | निश्कर्ष. |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलते काय ? | **नाही.** |
| ०२. | उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **नाही.** |
| ०३. | खटल्यांची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **नाही.** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज नामंजुर करणेत आला.** |

## <u>का र ण मि मां सा.</u>

### <u>वादप्रश्न क्र.०१ बाबत.</u>

०७. कबुल तथ्यानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी, उद्घोषणेसाठी आणि ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादींनी या अर्जाद्वारे केवळ 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' यांना या कामी प्रतिवादी क्र.०६ म्हणुन सामील करावे इतकीच विनंती केली आहे, की ज्यामुळे या दाव्याचे मुळ स्वरुप निश्चीतच बदलत नाही. सबब मी **वादप्रश्न क्रमांक ०१ नकारार्थी** उत्तरी करीत आहे.

**<u>वादप्रश्न क्र.०२ व ०३ बाबत.</u>**

०८. विचाराधीन वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु आणी विस्तार भयास्तव एकत्रीत विचारात घेतले आहेत. कबुल तथ्यानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी, उद्घोषणेसाठी आणि ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या दावा कलम ०७ चे अवलोकन केले असता त्यात सन २०१९ च्या एप्रिल महिन्यात प्रतिवादी क्र.०३ 'संजय खाशाबा पिसाळ' हे दावा मिळकतीत आले व त्यांनी वादींना, दावा मिळकत त्यांनी विकत घेतली आहे व वादींनी ताबडतोब मिळकतीतुन चालते व्हावे, अशी धमकी वादींना दिली तेंव्हा वादींनी कागदपत्रे प्राप्त करुन पाहिली असता, त्यांना वादातीत खरेदी व्यवहाराची माहिती मिळाली असे कथन केले आहे. कबुल तथ्यानुसार वादींनी ते खरेदीपत्र त्यांचे हिश्यावर बंधनकारक नाही अशा परिणामकारक ठरावाची/उद्घोषणेची मागणी केली आहे. कोणत्याही जाहीर ठरावा/उद्घोषणे करिता विनंती 'मुदतीचा कायदा १९६३ चे कलम ५७ नुसार तीन वर्षाच्या आत दावा दाखल करणे आश्वयक व गरजेचे आहे. वादींनी हा दावा दिनांक २९/०४/२०१९ रोजी दाखल केला आहे. सबब प्रथम दर्शनी वादीचा दावा विद्यमान प्रतिवादी क्रमांक ०३ चे विरुध्द मुदतीत आहे असेच म्हणावे लागेल. परंतु विद्यमान प्रतिवादी क्रमांक ०३ यांचा <u>वादातीत खरेदीपत्राशी कसलाही संबंध नाही</u> ही देखील उभय पक्षास आणी विशेषत: वादीस मान्य अशी वस्तुस्थिती आहे. कारण वादातीत खरेदीपत्र हे विद्यमान प्रतिवादी क्रमांक ०३ यांनी न करता, त्यांचे भाऊ रामचंद्र खाशाबा पिसाळ यांचे एकट्याचे लाभात प्रतिवादी क्र.०२ यांनी केलेले आहे. जर विद्यमान

प्रतिवादी क्रमांक ०३ यांनी वादीस दावा मिळकतीतुन बेदखल करण्याची धमकी दिली असेल, तर त्यांचे विरुध्द वादी हे मनाईची दाद नक्कीच मागु शकतील. परंतु वादातीत खरेदीपत्र वादींचे हिश्यावर बंधनकारक नाही असा ठराव वादींना पाहीजे असेल तर, ज्याच्या लाभात खरेदीपत्र करुन दिले आहे, म्हणजेच रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना या दाव्यात प्रतिवादी करणे आवश्यक व गरजेचे होते की जे झालेले नाही.

०९. मुळ/विद्यमान प्रतिवादी क्र.०३ यांनी या कामी दिनांक ०९/०९/२०१९ रोजी निशाणी १६ येथे त्यांची कैफियत दाखल करुन त्यात 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' हे आवश्यक पक्षकार असुन त्यांना सामील केले नसल्याने दाव्यास 'आवश्यक पक्षकार सामील नाहीत' या तत्वाची बाधा येते, सबब वादीचा दावा रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे. म्हणजेच 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' हे या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत याची संपुर्ण जाणीव व माहिती वादींना दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच झाली होती. म्हणजेच रामचंद्र खाशाबा पिसाळ यांचे विरुध्द जाहीर ठरावाची मुदत ही दिनांक ०९/०९/२०१९ पासुन सुरू झाली व ती दिनांक ०९/०९/२०२२ रोजी कालबाह्य झाली आहे. वादींना 'रामचंद्र खाशाबा पिसाळ' हे या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत या बाबत जाणीव व कल्पना आले नंतर वादींनी दाव्यात दुरूस्ती करुन सदरील रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना या कामी सामील करुन घेणे करिता व दाव्यात तशी दुरूस्ती होऊन मिळणे करिता अर्ज दाखल करणे आवश्यक व गरजेचे होते, परंतु वादींनी 'जो पर्यंत प्रतिवादींनी वादीचा दावा आदेश ०७ नियम ११ नुसार फेटाळणेत यावा' असा अर्ज दाखल केला त्यानंतरच हा अर्ज पुढे केला आहे.

कबुल तथ्यानुसार मुळ प्रतिवादी क्र.०३ यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस (प्रतिवादी क्र.०३अ ते ०३क) यांनी या दाव्यात हजर होऊन दिनांक २०/१०/२०२३ रोजी 'वादीचा दावा आदेश ०७ नियम ११ नुसार फेटाळणेत यावा' असा अर्ज दिला आहे. ते काही असले तरी वादीस, रामचंद्र खाशाबा पिसाळ हे या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत, या बाबत जाणीव व कल्पना दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच झाली असताना व पर्यायाने जाहीर ठरावाची मागणी दिनांक ०९/०९/२०२२ रोजीच कालबाह्य झाली असल्यामुळे वादीची जाहीर ठरावाची/उद्घोषणेची मागणी मुलतःच बेकायदेशीर व कालबाह्य झाली आहे. तसेच वादीचेच दाव्यातील कथनांनुसार सन २०१९ च्या एप्रिल महिन्यात प्रतिवादी क्र.०३ 'संजय खाशाबा पिसाळ' हे दावा मिळकतीत आले व त्यांनी वादींना, 'दावा मिळकत त्यांनी विकत घेतली आहे व वादींनी ताबडतोब मिळकतीतुन चालते व्हावे' अशी धमकी वादींना दिली, तेंव्हा वादींनी कागदपत्रे प्राप्त करुन पाहिली असता त्यांना वादातीत खरेदी व्यवहाराची माहिती मिळाली, असे कथन केले आहे.

१०. वादींनी कागदपत्रे पाहिली म्हणजेच नक्कीच मिळकतीचा ७/१२ आणी वादातीत खरेदीपत्र पाहीले असणार. म्हणजेच मिळकत ही प्रतिवादी क्र.०२ यांनी रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना विक्री केल्याचे देखील वादीस एप्रिल २०१९ मध्येच समजले असणार. असे असताना सदरील रामचंद्र खाशाबा पिसाळ यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन सामील न करण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण वादींनी दाव्यात अगर या अर्जात दिलेले नाही. सबब दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०७ नियम (११) (ड) नुसार वादीचा दावा जाहीर ठरावाच्या मागणी पुरता बेकायदेशीर झालेलाच आहे. असे असले

तरी ज्या व्यक्तीच्या विरुध्द जाहीर ठराव मागितला आहे, ती व्यक्ती या क्षणी दाव्यात पक्षकार म्हणुन सामील नाही ही वस्तुस्थिती आहे. सबब या दाव्यातील आदेश त्या व्यक्तीवर बंधनकारक राहणार नाहीत हे देखील वास्तव आहे. तसेच प्रतिवादींनी दाखल केलेल्या ना. वरिष्ठ न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचे वाचन केले असता, त्यामध्ये '***दाव्याचा निकाल ज्याचे अनुपस्थितीत करता येणार नाही अशी व्यक्ती दाव्यास अत्यावश्यक पक्षकार असते व अशा व्यक्तीस दाव्यात पक्षकार केले नसेल तर दावा चालु शकत नाही***' असे निर्देशित केले आहे. सदरील न्यायनिर्णयांचा सारांश या कामी लागु पडतो तसेच वादीची जाहीर ठरावाची मागणी कालबाह्य झाली असल्याने/मुदतीच्या कायद्याने प्रतिबंधीत आणी बेकायदेशीर ठरत असल्यामुळे 'उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक नाही तसेच खटल्यांची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी देखील प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक नाही' या अनुमानास मी आलो आहे. या सर्व तथ्यांचा एकत्रीत विचार करता **वादप्रश्न क्रमांक ०२ आणी ०३ नकारार्थी उत्तरी** करुन **वादप्रश्न क्रमांक ०४** चे उत्तरा दाखल मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी ४४ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. या अर्जाचा खर्च वादीवर राहील.

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.03.13 12:25:10 +0530

ठिकाण – कऱ्हाड. (किरण खोंद्रे)

दिनांक – १०/०३/२०२६ ३रे सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कऱ्हाड.